**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :- २१/०८/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **मासिक सभा** बुधवार दिनांक २१/०८/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा.लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. अँड. चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १०. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ११. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १२. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १३ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १४. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १५. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १६. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १७. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

प्रशासन अधिकारी शांताराम राऊत, उपअभियंता, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, एस. एस. मोरे, एस.एम. कुदळे, संजय घुबे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, , श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण सहा. आरोग्याधिकारी जे.एस. जानकर, उदयान - चांदेरे आर. बी., इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय**

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. १ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

उद्योगनगर चिंचवड येथील उद्यानास साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे असे नामकरण करण्यात यावे.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे स.न. १०९/११० व आरक्षण क्र. ७९/८० हे उद्यानसाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणं हे महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेऊन ते विकसित केले जावे. यासाठी ठराव मंजूर करुन घ्यावा. तसेच प्रशासनास सदर कामाची लवकरात लवकर कारवाई करुन हे आरक्षण ताब्यात घ्यावे हि विनंती.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे, भाजी मंडई व हॉकर्स झोनची व्यवस्था केलेली आहे परंतु हया भागातील भाजी विक्रेते व हातगाडीवर फळे विकणा-यांना अजुन या तयार असलेल्या मंडईत व हॉकर्स झोनमध्ये बसण्यास परवानगी मिळालेली नाही. तसेच भाजी मंडईच्या निविदा काढल्या असता १०च भाजी विक्रेत्यांनी गेली दोन वर्षापुर्वी निविदा भरल्या व त्यांना मिळाल्या आहेत. तरी पुढील निविदा काढेपर्यंत व हॉकर्स झोनची व्यवस्था होईपर्यंत हया भागातील भाजी विक्रेते व हातगाडी धारकांवर कोणती अतिक्रमण कारवाई करु नये असा ठराव करावा व या ठिकाणी हॉकर्स झोन व भाजी मंडई सुरु करावी.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २१ मध्ये डासांचे प्रमाण वाढत असून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भितीचे प्रमाण वाढत आहे तरी आठवडयातून २ वेळ प्रभाग क्र. २१ मध्ये धुरीकरण करण्यात यावे.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नांमकरणाबाबत –

१. रावेत स.न. १०३ मधील सोसायटीचे नांव अभिनव कॉलनी असे करण्यात यावे.
२. वाल्हेकरवाडी स.नं. ११५/१ श्रीपती कॉलनी हे नांव देण्यात यावे.

३. किवळे स्मशान भुमीस नागुजी लक्ष्मण धुमाळ वैकुंठ धाम असे नांव देणेत यावे.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

उद्योगनगर मधील दत्तमंदिर, ब्रम्हगिरी जवळील चौकास अद्याप कोणतेही नामकरण केले नसून सदर चौकास राजे शिव छत्रपती (चौक) असे नामकरण करण्यात यावे.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २१ उद्योगनगर झोपडपट्टी मधील रस्त्याची कामे अर्धवट स्वरुपात केल्यामुळे त्या ठिकाणी पावसाळयात पावसाचे व ड्रेनेजचे घाण पाणी खड्डयात व नागरिकांच्या घरात जमा होऊन आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने लवकरात लवकर अर्धवट राहिलेले पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम पुर्ण करावे तसेच झोपडपट्टीत महिलांची शौचालयाची गैरसोय होत असल्याने त्या ठिकाणी महिलांसाठी नवीन शौचालय उभारण्यात यावेत.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

काळेवाडी स.नं. १०६/१०७ पासून पिंपरीनगर येथील आंबेडकर कॉलनीपर्यंत पवना नदीवर पुल तयार करण्यात यावा. त्यामुळे पिंपरीनगर येथील वाहतूक अतिशय कमी होऊन काळेवाडीतील नागरिकांना पिंपरीनगर येथील इंदिरा गांधी पुलावर सहजपणे जाता येईल व त्यांचा वेळ वाचेल.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

शगुन चौक ते मेन बाजार महात्मा गांधी रोड, इंदिरा गांधी पुल भाटनगरपर्यंत, शगुन चौक ते रेल्वे स्टेशनपर्यंत झुलेलाल मंदिर ते मंडई समोरील रस्त्यालगत पुन्हा रेल्वे स्टेशनपर्यंत (सेवा विकास बँक ) तसेच शगुन चौक ते साई चौक तसेच शगुन चौक ते जयहिंद शाळेपर्यंत नो हॉकर्स झोन जाहीर करण्यात यावा. या ठिकाणी प्रचंड प्रमाणात वाहतुक असते. मोठया प्रमाणात अपघात होतात. बाजारात येण्या-जाण्यासाठी अडथळे निर्माण होतात. वाहतुक जाम होते.

विषय क्र. १० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी नगर येथिल इंदिरा गांधी पुलाखालील मनपाने बनविलेली जी दुकाने आहेत ती दुकाने विक्रीस न गेल्यामुळे तिथे अतिक्रमणे झालेले आहे. दुकानांची शटर तोडलेले आहेत. त्यामध्ये जुगार, अनैतिक व्यवसाय चालू आहेत. तसेच इतरही अतिक्रमण झालेले आहेत. ही सर्व अतिक्रमण काढून त्या ठिकाणी मच्छीमार्केट सुक्या मासळीचे मार्केट इत्यादी मार्केट करण्यात यावे.

विषय क्र. ११ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २२ चिंचवड मधील महात्मा फुले विद्यालयाशेजारील नवीन बांधलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीला कृष्णाजी लक्ष्मण चिंचवडे पाटील शैक्षणिक संकुल असे नामकरण करण्यात यावे.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक - मा. शमीम पठाण

अनुमोदक- मा. नेटके सुमन राजेंद्र

महाराष्ट्राचे थोर समाज सुधारक, अनिसचे अध्यक्ष, प्रबोधनकार, पुरोगामी विचारांचे प्रवर्तक कै. मा. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाली. त्यांना श्रध्दांजली वाहुन आजची सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. अध्यक्षा - बुधवार दि. १६/९/२०१३ रोजी स. ११.४५ वा. पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे

सही/-

[ पवार यमुनाताई रमणनाना ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**( दि. २१/०८/२०१३ ची तहकूब सभा )**

**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :- १६/०९/२०१३ वेळ :- दु. ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **दि. २१/०८/२०१३ ची तहकूब सभा** सोमवार दिनांक १६/०९/२०१३ रोजी स. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ५. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ६. | मा.लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १०. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ११. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १२. | मा. गावडे जयश्री वसंत | सदस्य |
| १३. | मा. शेट्टी प्रसाद | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १६. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १७. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १८. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १९. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २०. | मा. आसवानी सविता धनराज | सदस्य |
| २१. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी सुभाष माछरे, मा. कार्य. अभियंता रविंद्र दुधेकर, शरद जाधव, वसंत काची, प्रशासन अधिकारी शांताराम राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, सुधाकर कुदळे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण, उद्यान सहा. आर.बी. चांदेरे सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली

दि. १९/६/२०१३ व १७/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यत्रिका ४ व ५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्र. ३८ — विषय क्र. १

दि. १६/०९/२०१३ — विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. शमीम पठाण — अनुमोदक: मा. लोंढे गणेश नारायण

संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

उद्योगनगर चिंचवड येथील उद्यानास साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे असे नांमकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३९ — विषय क्र. २

दि. १६/०९/२०१३ — विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. मंदाकिनी अर्जुन ठाकरे — अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा. मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे स.न. १०९/११० व आरक्षण क्र. ७९/८० हे उद्यानसाठी आरक्षित आहे. सदर आरक्षण हे महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेऊन ते विकसित करावे.

तसेच प्रशासनाने सदर कामाची लवकरात लवकर कारवाई करुन हे आरक्षण ताब्यात घेण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४० विषय क्र. ३

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. मंदाकिनी अर्जुन ठाकरे अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा. मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथे, भाजी मंडई व हॉकर्स झोनची व्यवस्था केलेली आहे परंतु या भागातील भाजी विक्रेते व हातगाडीवर फळे विकणा-यांना अजुन या तयार असलेल्या मंडईत व हॉकर्स झोनमध्ये बसण्यास परवानगी मिळालेली नाही. तसेच भाजी मंडईच्या निविदा काढल्या असता १०च भाजी विक्रेत्यांनी गेली दोन वर्षापुर्वी निविदा भरल्या व त्यांना मिळाल्या आहेत. तरी पुढील निविदा काढेपर्यंत व हॉकर्स झोनची व्यवस्था होईपर्यंत हया भागातील भाजी विक्रेते व हातगाडी धारकांवर कोणतीही अतिक्रमण कारवाई करु नये व या ठिकाणी हॉकर्स झोन व भाजी मंडई सुरु करणेस मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४१ विषय क्र. ४

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. को-हाळे अनंत सुभाष

संदर्भ मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २१ मध्ये डासांचे प्रमाण वाढत असून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भितीचे प्रमाण वाढत आहे तरी आठवडयातून २ वेळ प्रभाग क्र. २१ मध्ये धुरीकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४२ विषय क्र. ५

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन

संदर्भ मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

१. रावेत स.न. १०३ मधील सोसायटीचे नांव अभिनव कॉलनी असे करण्यात यावे.

२. वाल्हेकरवाडी स.न. ११५/1 श्रीपती कॉलनी हे नांव देण्यात यावे.

३. किवळे स्मशान भुमीस नागुजी लक्ष्मण धुमाळ वैकुंठ धाम असे नांव देणेत यावे.

वरीलप्रमाणे नांमकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला

ठराव क्र. ४३ विषय क्र. ६

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. को-हाळे अनंत सुभाष

संदर्भ मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

उद्योगनगर मधील दत्तमंदिर, ब्रम्हगिरी जवळील चौकास अद्याप कोणतेही नामकरण केले नसून सदर चौकास राजे शिव छत्रपती (चौक) असे नामकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४४ विषय क्र. ७

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. लोंढे गणेश नारायण अनुमोदक: मा. को-हाळे अनंत सुभाष

संदर्भ मा. लोंढे गणेश नारायण यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २१ उद्योगनगर झोपडपट्टी मधील रस्त्याची कामे अर्धवट स्वरुपात केल्यामुळे त्या ठिकाणी पावसाळयात पावसाचे व ड्रेनेजचे घाण पाणी खड्डयात व नागरिकांच्या घरात जमा होऊन आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने लवकरात लवकर अर्धवट राहिलेले पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे काम पुर्ण करावे तसेच झोपडपट्टीत महिलांची शौचालयाची गैरसोय होत असल्याने त्या ठिकाणी महिलांसाठी नवीन शौचालय उभारण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४५ विषय क्र. ८

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा. तरस बाळासाहेब जयवंत

संदर्भ मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

काळेवाडी स.न. १०६/१०७ पासून पिंपरीनगर येथील आंबेडकर कॉलनीपर्यंत पवना नदीवर पुल तयार करण्यात यावा. त्यामुळे पिंपरीनगर येथिल वाहतूक अतिशय कमी होऊन काळेवाडीतील नागरिकांना पिंपरीनगर येथील इंदिरा गांधी पुलावर सहजपणे जाता येईल व त्यांचा वेळ वाचेल.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४६ विषय क्र. ९

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा. पवार यमुनाताई रमणनाना

संदर्भ मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

शगुन चौक ते मेन बाजार महात्मा गांधी रोड, इंदिरा गांधी पुल भाटनगरपर्यंत, शगुन चौक ते रेल्वे स्टेशनपर्यंत झुलेलाल मंदिर ते मंडई समोरील रस्त्यालगत पुन्हा रेल्वे स्टेशनपर्यंत (सेवा विकास बँक ) तसेच शगुन चौक ते साई चौक तसेच शगुन चौक ते जयहिंद शाळेपर्यंत नो हॉकर्स झोन जाहीर करण्यात यावा. या ठिकाणी प्रचंड प्रमाणात वाहतुक असते. मोठया प्रमाणात अपघात होतात. बाजारात येण्या-जाण्यासाठी अडथळे निर्माण होतात. सदर कार्यवाहीस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४७ विषय क्र. १०

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा. पवार यमुनाताई रमणनाना

संदर्भ मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी नगर येथिल इंदिरा गांधी पुलाखालील मनपाने बनविलेली जी दुकाने आहेत ती दुकाने विक्रीस न गेल्यामुळे तिथे अतिक्रमणे झालेले आहे. दुकानांची शटर तोडलेले आहेत. त्यामध्ये जुगार, अनैतिक व्यवसाय चालू आहेत. तसेच इतरही अतिक्रमण झालेले आहेत. ही सर्व अतिक्रमण काढून त्या ठिकाणी मच्छीमार्केट सुक्या मासळीचे मार्केट इत्यादी मार्केट करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ४८ विषय क्र. ११

दि. १६/०९/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन अनुमोदक : मा. शमीम पठाण

संदर्भ : मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन यांचे दि. २१/०८/२०१३ रोजीचे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र. २२ चिंचवड मधील महात्मा फुले विद्यालयाशेजारील नवीन बांधलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीला कृष्णाजी लक्ष्मण चिंचवडे पाटील शैक्षणिक संकुल असे नांमकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्षा

ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,

सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी

सभाशाखा, ब प्रभाग समिती

पि.चिं.मनपा, चिंचवड-३३.

क्र. एएमसी/बप्र२/कावि/२८२/२०१३, दि. ३०/०९/२०१३